(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय जनता पक्षाचा उदय व विकासाच आढावा

**अरुण दामोदर नलवडे, संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

---

**प्रस्तावना :** स्वातंत्र्य चळवळ अत्यंत प्रभावी बनण्यासाठी मुस्लीम जनतेचा सहभाग आवश्यक असल्याचे महात्मा गांधीचे म्हणणे होते. त्यांना विश्वास होता कि, हिंदू व मुस्लीम एकत्र लढले तर स्वातंत्र्य सहज प्राप्त होईल पण त्याच्या या मताचा प्रभाव पडला नाही उलट हिंदू व मुस्लीम यांच्या दंगली होऊ लागल्यायाचा हिंदू महासभाने१९२३ ला "हिंदू रक्षा दलाची" स्थापना केली. या नंतर वर्ण जाती विरहीत समजा संघटीत करण्यासाठी १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेची स्थापना केली या संघटनेच्या सहकार्यानेच १९५१ डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली जनसंघ या राजकीय पक्षाची स्थापना झाली जनसंघने १९८० पर्यंत भारतीय राजकारणात आपला प्रभाव पाडला. पण १९८० ला अटल बिहारी वाजपेय यांच्या नेतृत्वाखाली जनसंघाचे रुपांतर भारतीय जनता पक्षात झालेज्या पक्षाने १९८० ते आतापर्यंत आपल्या पक्षच विस्तार भारतीय राजकारणात केलेला दिसतो.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सैनिक संघटना नसून विचार सेवक संघटने आहे. ज्यात नसून सेवक हा आचार-विचाराने कठोर, शिस्तबद्ध असला पाहिजे असे डॉ. हेडगेवारांना वाटत होते त्यादृष्टीने स्वयंसेवक व संघटना यांना आकार दिला गेला. डॉ. हेडगेवार यांनी १९२५ ते १९४० या कालावधीत संघाचे नेतृत्व केले त्यानंतर १९४० ते १९७३ पर्यंत श्री मा.स.गोळवलकर हे संघप्रमुख सरसंघचालक झाले या संघटनेच्या माध्यमातून हिंदुत्ववादी विचारधारेचा प्रभाव वादावाण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मृत्युनंतर म्हणजे १९७३ नंतर श्री मधुकर दत्तात्रय तथा बाळासाहेब देवरस सरसंघचालक झाले. याच संघटनेतून ११ मार्च १९९४ पासून प्रा. राजेंद्रसिंह हे सरसंघचालक आहेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जगातील एक मोठी संघटना मानली जाते.

**जनसंघ :** जनसंघ हा राष्ट्रीय स्तरावरील हिंदुत्ववादी पक्ष म्हणून ओळखला जातो स्वातंत्र्यपूर्वी हिंन्दु महासभारामराज्य परिषद, आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघ या संघटना हिन्दुत्वाच्या होत्या काँग्रेस पक्षाचे जेष्ट नेते पंडित मदन मोहन मालविय आणि लाला लजपतराय यांनी १९१५ मध्ये अखिल भारतीय हिन्दू महासभेची स्थापना केली. इ.स. १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली इ.स. १९४८ मध्ये म. गांधीच्या हत्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली तेंव्हा डॉशामा प्रसाद मुखर्जी यांची अनेक राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील लोकांनी भेट घेऊन विचार विनिमय केला. आणि मग पुढे डॉ. शामाप्रसाद मुखर्जी आणि संघाचे गोळवलकर गुरूजी यांच्यात चर्चा होऊन' भारतीय जनसंघ या नव्या राजकीय पक्षाची स्थापना २१ ऑक्टोबर १९५१ रोजी दिल्ली या ठिकाणी करण्यात आली.[१] या पक्षाचे नेतृत्व डॉ मुखर्जी यांच्याकडे सोपविण्यात आले. या पक्षामध्ये राष्ट्रीय सेवकसंघातील अनेक सभासद व कार्यकर्ते सामील झाले. पक्षाचा प्रसार व्हावा या उद्देशाने लोकसभा व विधानसभेतील जास्तीत जास्त जागा लढविण्याचा निर्णय पक्ष नेत्यांनी घेतला. जनसंघाने हिंदुमहासभेच्या 'हिंदुराष्ट्र' या संकल्पने ऐवजी 'भारतीय राष्ट्र' ही व्यापक कल्पना स्वीकारली आहे. याबात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी जनसंघाचा एकच विचार मांडला, तो होता राष्ट्रीय राजकारणाचा. जातीपातीच्या राजकारणाचा नाही, धार्मिक राजकारणाचा नाही, जातींची समीकरणे जुळविण्याचा नाही, जातींची अद्याक्षरे घेऊन त्यांचे शब्द तयार करून राजकारण करण्याचा नाही. साहजिकच पक्षामध्ये अहिंदू व्यक्तींनाही प्रवेश दिला जातो. जनसंघाने लोकसभेच्या तीन आणि विधानसभेच्या ३६ जागा १९५२ च्या निवडणूकीत 'दिपक' या चिन्हावर लढविल्या.[२] गांधीच्या हत्यामुळे झालेल्या निवडणूकीत जनसंघाला एक टक्के मते मिळाली. पक्षाचे सर्व उमेदवार पराभूत झाली. डॉ. मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाचे नेतृत्व दिनदयाळ उपाध्याय यांच्याकडे आलेश्री. उपाध्याय व श्री. अटलबिहारी वाजपेयी या दोघांच्या विचारातून राजकीय क्षितीजावर एका परिपक्व राजकीय संस्कृतीचा प्रवाह अधिक विस्तारला गेला. परंतु दिनदयाळ उपाध्याय यांचा मृत्यू दि१० फेब्रुवारी १९६८ मध्ये झाला त्यानंतर पक्षाची धुरा अटलबिहारी वाजपेयी यांनी सांभाळली.

लोकदल, समाजवादी पक्ष, जनसंघ व संघटन काँग्रेस ह्या चार पक्षांच्या नेत्यांनी२० जानेवारी १९७७ ची निवडणूक एकत्रित येऊन लढण्याचा निर्णय घेतला व नव्याने प्रस्थापित करावयाच्या पक्षाचे नाव 'जनतापक्ष' असे ठेवले. या पक्षाचा ध्वज, निवडणूक चिन्ह निवडणूक कार्यक्रम एक असावा असा निर्णय घेण्यात आला. पक्षाचे अध्यक्ष म्हणून मोरारजी देसाई, सरचिटणीस अडवाणी आणि कोषाध्यक्ष शांतीभूषण यांची निवड करण्यात आली[३] भिन्न भिन्न राजकीय विचारसरणीच्या आणि राजकीय प्रकृतीच्या पक्षांनी जनता पक्ष बनला होता. सर्व घटक पक्षांनी आपापले उपांगे बरखास्त करून त्यांचीही जनता पक्षात विलीनीकरण करावे असा आग्रह धरण्यात आला पण तो मान्य न झाल्याने जनसंघ या आघाडीतून बाहेर पडला व भारतीय जनताजनता पक्ष या वाणे उदयास आला.

जनसंघचा लोकसभा निवडणुकीचा आढावा (१९५२-१९८०)

| सार्वत्रिक निवडणूक | वर्ष | एकूण जागा | लढवलेल्या जागा | प्राप्त जागा | मताची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | १९५२ | ४१ | ०३ | ०० | ३१. |
| दुसरी | १९५७ | ४४ | ०७ | ०२ | ५.९ |
| तिसरी | १९६२ | ४४ | १७ | ०० | ६.४ |
| चौथी | १९६७ | ४५ | २६ | ०० | |
| पाचवी | १९७१ | ४५ | १३ | ०० | |
| सहावी | १९७७ | ४८ | - | - | |
| सातवी | १९८० | ४८ | - | - | |

**भारतीय जनता पक्ष :** पूर्वाश्रमीच्या जनसंघाने दि६ एप्रील १९८० रोजी दिल्लीच्या फिरोजशहा कौटला मैदानावर संम्मलेन घेऊन भारतीय जनता पार्टी या या नव्या पक्षाची घोषणा केली. या पक्षाचे अध्यक्ष म्हणून तत्कालीन परराष्ट्रमंत्री श्री अटलबिहारी वाजपेयी यांची तर महासचिव म्हणून श्री. लालकृष्ण अडवाणी, सिकंदर बख्त, व मुरली मनोहर जोशी यांची नियुक्ती करण्यात आली होती. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील बांद्रा समता नगरात दि. २८, २९, ३० डिसेबर १९८० रोजी राजकीय पक्षाचे पहिले अधिवेशन झाले. त्यावेळेला पक्षाने जो विकासाचा निर्धार केला होता त्यावरच पक्ष २५ वर्ष कार्यरत राहिला. सुरूवातीला भारतीय जनता पार्टी म्हणजे शेठजी -भटजीची पार्टी म्हणून या पक्षाची अवहेलना झाली. परंतु पक्षाची वाढ खुंटली नाही. समाजातील सर्व स्तरातील, सर्व जातीपातीतील माणसांचा समावेश या पक्षात झाल्यामुळे हा पक्ष वाढत गेलेला दिसतो.

इ.स. १९८०-१९९० या कालावधीत भारतीय जनता पार्टी देशातील काँग्रेसलाशह देऊ शकणारा प्रखर राष्ट्रवादी पक्ष म्हणून लोकप्रिय होता. अटलजींनी संघटना-संरचना-संघर्ष ही त्रिसूत्री मुंबईच्या अधिवेशनात दिल्याने जिल्हा, प्रांत पातळीवरया पक्षाची बाढ होत गेली. केंद्रात व्ही.पी.सिंग पंतप्रधान असताना लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली "सोमनाथ ते अयोध्या ही ऐतिहासिक रथयात्रा काढली आणि राजकीय स्तरावर परिवर्तनाची लाट निर्माण केली. आयोध्येत झालेल्या कारसेवेनंतर भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाले. या भारतीय जनता पक्षाची ध्येय-धोरणे व कार्यक्रमात स्वदेशीवर, स्वालंबनावर भर देणे, परकीय मदत बंद करण्याच्या दृष्टीने प्रत्यनशील राहणे., कसणाऱ्यांना जमीनी देणे., उद्योगधंद्यांना मोकळीक देणे, आर्थिक प्रवाह मुक्त करून किमतीवर नियंत्रण घालणे., व्यवस्थापन आणि लाभ त्यात मजुरांचा सहभाग, बेकारांना आर्थिक साहय्य करणे., परकीय कंपन्याचे व बँकाचे राष्ट्रीयीकरण करणे, अण्वस्त्राची निर्मिती करणे., आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे, हिंदी राष्ट्रभाषा, गोवधबंदी, सर्वांसाठी समान कायदा यावर भर देणे, काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे३७० वे कलम रद्द करणे असे विविध विषय जाहीरनाम्यात अंतर्भूत करून त्यांनी जनाधार वाढवाला . याच आधारावर भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीत निवडणूकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेलीआहे

तक्ता क्रमांक **2 :** भारतीय जनता पक्ष १९८० ते २०१९पर्यंत लोकसभा निवडणुकीचा आढाव

| **लोकसभा** | **वर्ष** | **जिंकलेल्या जागा** | **जागामध्ये परिवर्तन** | **मताची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आठवी | १९८४ | २ | २ | ७.७४ |
| नववी | १९८९ | ८५ | ८३ | ११.३६ |
| दहावी | १९९१ | १२० | ३७ | २०.११ |
| अकरावी | १९९६ | १६१ | ४१ | २०.२९ |
| बारावी | १९९८ | १८२ | २१ | २५.५९ |
| तेरावी | १९९९ | १८२ | 0 | २३.७५ |
| चौदावी | २००४ | १३८ | ४५ | २२.१६ |
| पंधरावी | २००९ | ११६ | २२ | १८.८० |
| सोळावी | २०१४ | २८२ | १६६ | ३१.०० |
| सतरावी | २०१९ | ३०३ | २१ | ४१.०० |

तक्ता क्रमांक 2 वरून भारतीय जनता पक्ष १९८० ला स्थापन झाल्यानंतर १९८४ ला आठव्या लोकसभा निवडणुकीत २ जागा जिंकल्या त्या वेळी मताची टक्केवारी ७.७४ इतकी होती. यानंतर १९८९ मध्ये ८५ जागा जिंकून पक्षाचा विस्तार केला. १९९० नंतर भारतीय राजकारणात बदल होऊ लागले ज्यामध्ये विविध घटक राजकारणात समावले. ज्यात मंडल आयोग, जागतिकीकरण, अयोध्या प्रश्न अशा विविध विषयाने राजकारण व्यापले गेले ज्याने भाजप पक्षाला विस्तार करण्यास संधी मिळाली. दहाव्या लोकसभेत १९९१ ला १२०, अकराव्या लोकसभेत १९९६ ला १६१ जागा प्राप्त झाल्या. बाराव्या लोकसभेत १९९८ व १९९९ ला १८२ जागा प्राप्त करून सर्वात मोठा पक्ष उदयास आला व आघाडी सरकार बनवले. यानंतर २००४ व २००९ ला अनुक्रमे १३८ व ११६ जागा प्राप्त झाला. २०१४ ला सोळाव्या लोकसभा निवडणुकीत भाजप पक्षाने प्रथमच २८२ जागा प्राप्त करून पूर्ण बहुमतचे सरकार बनवले. त्यानंतर २०१९ ला सतरावी लोकसभा निवडणुकीत ३०३ जागा प्राप्त केल्या व सरकार बनवले. याप्रकारे लोकसभेत या पक्षाचं स्वबळावर बहुमत तर आहेच, शिवाय तो आता राज्यसभेतही सर्वांत मोठा पक्ष बनला आहे. केंद्राप्रमाणेच देशभर राज्याराज्यांत या पक्षाने आपली सत्ता प्रस्थापित केली असून देशातल्या एकूण २९ राज्यांपैकी तब्बल अठरा राज्यांमध्ये भाजप सत्तेत आहे त्यातील तेरा राज्यांत भाजपचे स्वतःचे मुख्यमंत्री आहेत, तर पाच राज्यांत मित्रपक्षांसोबत भाजप सत्तेत आहे राज्यांतील सत्तेची बेरीज केली, तर जवळपास ६१ टक्के जनतेवर पक्षाचा अंमल चालताना दिसतो आहे. त्यापलीकडे देशाचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती हे पक्षाच्या मर्जीने स्थानापन्न झाले आहेत. लोकसभेचे (आणि राज्यसभेचे) अध्यक्ष असोत, राज्याराज्यांतील राज्यपाल असोत किंवा नीति आयोगापासून एनसीइआरटीच्या प्रमुखांपर्यंत हरतऱ्हेच्या महत्त्वाच्या पदांवर आजतारखेला भाजपची पूर्ण पकड निर्माण झाली आह.

**समारोप :** भाजपने आपला प्रभाव सर्वदूर तयार केला आहे पक्षाच्या स्थापनेपासून पहिली दहा-पंधरा वर्षं पक्षाला अगदीच कमी जनाधार होता आणि तोही विशिष्ट स्तरातला होता. आता हे चित्र पूर्णतः बदललं आहे आणि समाजाच्या जवळपास सर्व स्तरांतून त्यांना भरभरून पाठिंबा मिळतो आहे 'शेटजी-भटजींचा पक्ष' अशी ओळख असलेल्या या पक्षाला आता मध्यम जाती, अन्य मागास वर्ग, दलित, आदिवासी अशा सर्व घटकांची मजबूत मतं मिळत आहेत आर्थिक स्तरांचा विचार करता श्रीमंत आणि उच्च-मध्यमवर्गीयांप्रमाणेच मध्यमवर्गीय, निम्नमध्यमवर्गीय आणि गरीब घटकही पक्षाला मतदान करत आहेत. पूर्वी हा पक्ष प्रामुख्याने शहरी भागापुरता सीमित होता आता छोटी शहरं, निमशहरांसह खेड्यांमध्ये नि पाड्यांमध्ये तो पोहोचला आहे. लोकसभेपासून जिल्हापरिषद-पंचायत समितीच्या निवडणुकांपर्यंत सर्वत्र या पक्षाचं तगडं अस्तित्व निर्माण झालं आहे. जो पक्ष बरीच वर्षं राजकीयदृष्ट्या अस्पृश्य मानला जात होता, तो आता किमान निवडणुकांत तरी देशातला सर्वाधिक स्वीकारार्ह पक्ष बनला आहे[४]

संदर्भसूची:

१.भारतीय जनता पार्टी-भारतीय जनसंघ (१९५०-१९८०), पार्टी दस्तावेज, खंड-३,पृ.क्र.४०
२.पाटील संतोष, "राज्यशास्त्र, पृ.क्र.१३०
३. वैद सुमन, कोठेकर शांता, "स्वतंत्र भारताचा इतिहास" पृ.क्र ५०३
४. भाजपची घोडदौड...वेग आणि मर्यादा ७ डिसेंबर २०१७ महाराष्ट्र टाईम्स
५. पळशीकर सुहास (सपा) महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल